वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- मंगळवार दि.४ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

## लोकशाहीचा मोठा उत्सव, चला आता लागा कामाला



# ती कोण लाडकी बहिण जी होईल बीडची नगराध्यक्षा?

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

## आजपासून आचारसंहिता लागू, २ डिसेंबरला मतदान ३ डिसेंबरला होणार विजयाचा जल्लोष

मुंबई , (दिव्य न्युज):- अखेर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली आहे, मंगळवारी निवडणूक आयोगाची महत्त्वाची पत्रकार परिषद पार पडली, या पत्रकार परिषदेमध्ये निवडणूक आयोगानं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंर्भात महत्त्वाच्या तारखांची घोषणा केली आहे. येत्या दोन डिसेंबर रोजी राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी मतदान होणार आहे, तर तीन डिसेंबर रोजी निवडणुकीचा निकाल लागणार आहे.

राज्यात निवडणुकीसाठी पात्र असलेल्या २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींच्या निवडणुका होणार आहेत. यामध्ये २४६ नगर परिषदेमध्ये दहा नव्या नगर परिषदांचा समावेश आहे तर ४२ नगर पंचायतींमध्ये १५ नव्या नगर पंचायतींचा समावेश आहे. एकूण ६ हजार ८५९ सदस्य आणि २८८ अध्यक्षांची निवड होणार आहे.राज्यात गेल्या ४ वर्षांपासून प्रतिक्षेत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल अखेर आज ४ नोव्हेंबर रोजी वाजला. त्यानुसार, राज्यात २ डिसेंबरला मतदान होणार असून ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे, राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी याबाबतची घोषणा केली. त्यामुळे पुढील १ महिन्यात नगरपालिका निवडणुकांचा कार्यक्रम संपुष्टात येणार असल्याचे दिसून येते. १० नोव्हेंबरपासून उमेदवारांना उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असून १७ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारांना आपला उमेदवारी अर्ज दाखल करावा लागणार आहे. त्यामुळे, राजकीय पक्षांना पुढील ८ दिवसांत उमेदवारांची नावे निश्चित करावी लागणार आहेत. दरम्यान, आजपासून, ४ नोव्हेंबरपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

१. राज्य निवडणूक आयोगाने सांगितले की, ही पत्रकार परिषद नगरपरिषद आणि नगरपंचायत समित्यांबाबत आहेत, अशी माहिती आयोगाचे प्रमुख दिनेश वाघमारे यांनी दिली. त्यामुळे, महापालिका आणि जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या निवडणुका कधी, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.२. राज्यातील २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायत समित्यांची निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. १४७ नगर पंचायतींपैकी ४२ नगरपंचायतींच्या निवडणुका होत आहेत.३. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांसाठी एकूण १ कोटी ७ लाख ३७६ मतदार आहेत, त्यासाठी १३ हजार ३५५ मतदान केंद्र असणार आहेत. या निवडणुका देखील ईव्हीएमद्वारे होणार आहेत, अशी माहितीही आयोगाने दिली. तसेच,व्हीव्हीपॅटची सुविधा उपलब्ध नसणार, असेही स्पष्ट केले. ४.

▶▶ पान २ वर

### निवडणूक अधिसूचना

| | |
|---|---|
| उमेदवारी अर्ज दाखल | १० नोव्हेंबर २०२५ |
| अर्जाची शेवटची तारीख | १७ नोव्हेंबर २०२५ |
| उमेदवार अर्ज छाननी | १८ नोव्हेंबर २०२५ |
| उमेदवार अर्ज मागे घेण्याची तारीख | २१ नोव्हेंबर २०२५ |
| मतदानाची तारीख | २ डिसेंबर २०२५ |
| मतमोजणी | ३ डिसेंबर २०२५ |

## मतदान केंद्रांत मोबाईल नेता येणार, आयोगाचे मतदारांसाठी रेड कार्पेट

मुंबई , (दिव्य न्युज):- राज्यात होणाऱ्या नगरपंचायत, नगपरिषदेची निवडणुकांसाठी सर्व मतदान केंद्रांवर मतदारांना सोयीस्कर वातावरण मिळावे, यासाठी निवडणूक आयोगाकडून विशेष तयारी करण्यात आली आहे. विशेषत: दिव्यांग आणि जेष्ठ नागरिक मतदारांना मतदान करताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी रॅम्प आणि व्हिलचेअरची व्यवस्था सर्व मतदान केंद्रांवर केली जाणार आहे.

यावेळेस, मतदान केंद्रांच्या परिसरात मोबाईल नेण्यास परवानगी देण्यात आली असली तरी मतदान कक्षामध्ये मोबाईल नेण्यास बंदी असेल. मतदान कक्षाबाहेर मोबाईल ठेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केली जाणार आहे, ज्याचे नियोजन संबंधित निवडणूक अधिकारी करतील.प्रत्येक केंद्रावर पिण्याच्या पाण्याची सोय, शौचालये, तसेच मतदारांना ओळीमध्ये थांबताना त्रास होऊ नये यासाठी सावलीची व्यवस्था आणि पिण्याच्या पाण्याचे पॉईंट्स तयार करण्यात आले आहेत. तसेच ▶▶ पान २ वर

## दुबार मतदार कसं रोखणार? निवडणूक आयोगाची 'डबर स्टार चिन्हा'ची स्ट्रॅटेजी

मुंबई , (दिव्य न्युज):- राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतींसाठी मदतानाची तारीख जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार २ डिसेंबर रोजी मतदान घेण्यात येणार असून ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. यासाठी सर्व तयारी झाल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली. विरोधकांनी केलेल्या दुबार मतदानावरही निवडणूक आयोगाने




स्पष्टीकरण दिलं. अशा प्रकारचं संभाव्य दुबार मतदार रोखण्यासाठी निवडणूक आयोगाने डबल स्टारची स्ट्रॅटेजी आखण्यात आल्याची माहिती आयोगाने दिली.

मतदारयादीत दोनदा नाव असलेली नावे डबल स्टारने चिन्हांकित करण्यात आलेली आहेत. त्यानुसार डबल स्टार असणाऱ्या मतदारास अन्यत्र मतदान करणार नसल्याची हमी द्यावी लागणार आहे. डबल स्टार असणाऱ्या मतदारास बोटाला शाई लावलेली ▶▶ पान २ वर

# अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा बीडमध्ये स्वबळाचा नारा

### स्थानिकचा आखाडा जिंकण्यासाठी मतदार संघनिहाय दिसणार वेगवेगळी समिकरणे, जशी एकी मुंबईत दिसली तशीच एकीबीडमध्ये दाखवा, राजधानीतील बैठकीतून अजितदादांनी पदाधिकारी - कार्यकर्त्यांना दिले दिग्विजयाचे कानमंत्र

**स्थानिकच्या निवडणुकीत एनसीपीला बीडमध्ये मोठे यश मिळवून देवू - आ. विजयसिंह पंडित**

**गटबाजी थांबवून पक्ष हितासाठी लढा- संजय दौंड**

**आमच्यात मतभेद असतील पण मनभेद नाहीत-अमर नाईकवाडे**

**सर्वांनी एक दिलाने काम करावे-बळीराम गवते**

बीड, (दिव्य न्यूज): काल मुंबई येथे नगरपालिका नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या अनुषंगाने बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत एनसीपीच्या कार्य-कर्त्यांनी स्वबळाचा नारा दिला. यामुळे स्थानिकचा आखाडा जिंकण्यासाठी मतदार संघनिहाय वेगवेगळी समिकरणे' खऱ्या अर्थाने पहायला मिळणार आहेत. विशेष जशी एकी मुंबईत दिसली तशीच एकी बीडमध्ये दाखवा असे आवाहन ना. अजित पवार यांनी यावेळी केले आहे.

मुंबईत झालेल्या बैठकीला पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनीलजी तटकरे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे,



आ. विजयसिंह पंडित, आ. प्रकाशदादा सोळंके, आ. विक्रम काळे, माजी आमदार संजय दौंड, डॉ. योगेश क्षीसागर, कल्याण आखाडे, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, बीडचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे, प्रदेश प्रवक्ता भागवत तावरे, महिला जिल्हाध्यक्षा प्रज्ञाताई खोसरे, बीड जिल्हा राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, शेख तय्यब भाई, तालुकाध्यक्ष राजेंद्र राऊत, मोईन मास्टर, पालिकेचे गटनेते फारुख ▶▶ पान २ वर

### बीडला सहाशे कोटी दिले, आता नगराध्यक्ष द्या-ना. पवार

ना. अजित पवार यानी पालनही या नात्याने आतापर्यंत बीड शहराला सहाशे कोटी रुपयांचा निधी दिला आहे. हाच धागा पकडून जाता तुम्ही बाध्य द्या, असे आवाहन यावेळी ना. पवार यांनी केले. तसेच वटमा बाजूला ठेवून काम कना, वारण वानीचा फायदा हा आप विरोधकांना होईल, ही आपला उमेदवार म्हणून जवा, असेही आवाहन यावेळी अजित दादानी उपस्थित कार्यकत्यांना केले आहे.

### धनंजय मुंडेंनी संभाळून घेतले

काल मुंबईत प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरेंच्या बाजूला बसून माजी मंत्री धनंजय मुझे गाली सर्व जिल्ह्याचा बैठका घेतल्या, विशेष म्हणजे बीडच्या बैठकीतही त्यांनी ठोस आणि प्रभावी अशी भूमिका मांडली, विरोधात असतानाही आपण बीड जिल्ह्यात सत्ता आणली, आता तर दादा बीडचे पालकमंत्री आहेत, दादांच्या नेतृत्वात मोठ्या प्रमाणात विकास कार्य जिल्ह्यात सुरू आहेत. त्यामुळे हा स्थानिकचा आखाडा आपण मुलालाने माखु, त्यासाठी सर्वजण एक दिलाने कटू असे सांगत यावेळी आ. मुंडेंनी संभाळून घेतले.

### गटबाजीवरून राजेश्वर आबांचे नेत्यांकडे बोट

नेत्यांनी गटबाजी रोखण्याऐवजी गटबाजी वाढविण्यात अधिक लक्ष घातले तर पक्ष कसा उभा राहिल, त्यामुळे गटबाजी संपवून अजित दादांच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास ठेवून लढ़ा आणि पक्षा मोठा करा, असे आवाहन यावेळी जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांनी केले.

### प्रभाग १६ मध्ये रंगणार रंगतदार सामना

# दोन माजी उपनगराध्यक्ष फारुक पटेल, नसीम इनामदार आमने सामने




## प्रभागात घड्याळीचे काटे फिरणार की तुतारीचा आवाज येणार? मतदारात चर्चा

बीड, (दिव्य न्युज):- आज निवडणूक आयोगाने निवडणूकीचा आराखाडा घोषीत केला. २ डिसेंबरला मतदान आणि ३ डिसेंबरला निकाल लागणार आता प्रत्येक प्रभागात लगबग वाढणार असून येणाऱ्या दोन ते चार दिवसात सर्वच पक्षाचे उमेदवार ठरले जाणार आहेत. बीडमध्ये खरी लढत होणार ते अजित पवार यांच्या राष्ट्रवादी आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीमध्ये... बीडमधील प्रभाग क्रं. १६ मध्ये कोण उभे राहणार? कोणाचा सामना कोणाशी होणार याची शहरभर चर्चा होत आहे. कारण या प्रभागात दोन माजी उपनगराध्यक्ष उभे राहणार असून यामध्ये या प्रभाग क्रं. १६ चे विद्यमान नगरसेवक फारूक पटेल यांच्या समोर असणार तो या प्रभागाचे दुसरे माजी नगरसेवक हाजी नसीम इनामदार यांचा रंगतदार सामना निवडणूकीत रंगणार असून दोन माजी उपनगराध्यक्ष आमने सामने येणार असल्याने आता मतदार कोणाच्या पारड्यात कौल टाकतात याचा निर्णय ३ डिसेंरबला होणार आहे.

प्रभाग क्र.१६ हा उच्च शिक्षित मतदारांचा असून या प्रभागातून फारूक पटेल हे चार वेळेस निवडून आलेले आहेत. त्यापुर्वी याच प्रभागातून हाजी नसीमोद्दीन इनामदार हे ही निवडून आलेले आहेत. दोघेही बीड नगर पालिकेत उपनगराध्यक्ष राहिलेले असून दोघांचाही या प्रभागात चांगला जनसंपर्क आणि मित्र परिवार आहे. आता या प्रभागात घटयाळाचे काटे फिरणार की

▶▶ पान २ वर

## गोपीनाथ मुंडेंची खरी वारस मीच

# ना भाऊ-ना बहिणी फक्त करुणा वहिनी

## करुणा शर्मांची अजित पवारांसह मुंडे बहिण-भावांवर कडवी टीका

**मुंबई, (दिव्य न्युज):- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आज राज्य निवडणूक आयोगानं मराठवाड्यातील ४८ नगरपरिषद आणि ११ नगरपंचायतींसाठी निवडणुकीची घोषणा केलीय. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सध्या राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग येत असतानाच माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्याविरोधात सातत्याने टिकेची झोड उठवणाऱ्या करुणा मुंडे यांनी परभणीतून निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. ते दोघे नाही तर मी गोपीनाथ मुंडे यांची खरी वारस आहे, त्यांच्या विचारांवरच मी चालतेय असं म्हणत करुणा मुंडेंनी अर्थमंत्री अजित पवार व महायुतीवरही कडवी टीका केलीय.**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आलाय. या निवडणुकांसाठी प्रत्येक पक्ष तयारी करत असताना आता करुणा मुंडे त्यांच्या स्वराज्य शक्ती सेनेला घेऊन निवडणुकीच्या मैदानात उतरल्या आहेत. त्या मराठवाड्याबरोबरच राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये या निवडणुका स्वबळावर लढणार आहेत असं त्यांनी आज परभणीत पत्रकार परिषद घेऊन सांगितले.करुणा मुंडे म्हणाल्या, महाराष्ट्रात सध्या असलेल्या आठही पक्षांनी महाराष्ट्राला सत्तर वर्ष मागे नेले आहे. तुम्ही आमची झाका आणि आम्ही तुमची झाकतो हेच धोरण हे पक्ष राबवत आहेत. त्यामुळे आम्ही शेतकरी विद्यार्थी कष्टकरी महिला या सर्वांचे प्रश्न घेऊन राज्यातल्या सर्व निवडणुका लढवणार असल्याची घोषणा करूना मुंडे यांनी परभणीत केली आहे .तसेच अजित पवारांवर ७० हजार कोटींचे आरोप असतानाही देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना अर्थमंत्री केले. भाजपचे नेते अशाच पद्धतीने भ्रष्टाचाऱ्यांना सोबत घेत आहेत. गोपीनाथ मुंडे यांची खरी वारसदार मी आहे, हे दोघेही त्यांचे वारस नाहीत. गोपीनाथ मुंडेंनी सामान्यांच्या न्याय हक्कांची लढाई लढली. हीच लढाई मी लढत आहे. त्यामुळे त्यांची वारसदार मी असल्याचं करुणा मुंडे म्हणाल्या आहेत.

परळी मतदारसंघाविषयी बोलतानाही त्या म्हणाल्या, संपूर्ण



महाराष्ट्रात सारखेच परिस्थिती आहे. पदावर गेल्यानंतर गोरगरिबांची जमीन हिसकावून घेतात. महिलांवर अत्याचार, पिक विम्याचे पैसे खातात. शेतकऱ्यांच्या अनुदानाचे पैसे खातात. अजितदादा जे अर्थमंत्री होऊन बसले आहेत, त्यांनी ७५ हजार कोटींचा घोटाळा केला आहे. अर्थमंत्री तरीही त्यांना अर्थमंत्री म्हणून बसवलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लाज वाटली पाहिजे. चोराच्या हातात तिजोरीची चावी दिली. सगळ्या गोष्टींचा मला राग आहे. मंत्री झाल्यानंतर जर कोणी तोंड उघडलं तर तो कार्यकर्ता जेलमध्ये जातो. यांनी आई-वडिलांनाही सोडलं नाही. या सगळ्याचा राग आलाय. महाराष्ट्राच्या जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी 'स्वराज्य शक्ती सेना' पक्ष काम करत आहे असं करुणा मुंडे म्हणाल्या.

त्या पुढे म्हणाल्या, संपदा मुंडे, महादेव मुंडे, करुणा मुंडे, संतोष देशमुख असे महाराष्ट्रामध्ये प्रत्येक घरामध्ये आहे. धनंजय मुंडे, खासदार , आमदारांची कुंडली काढा ती अशीच निघणार. यासाठी मला आज पक्ष काढायची गरज पडली. नाहीतर मी कशाला माझ्या दोन मुलांना सोडून गावगाव गेले असते. मुंडे घराण्याची सून आहे मी.. या लोकांना लाज वाटली पाहिजे घरातल्या सुनेला तुम्ही न्याय देऊ शकत नाही. महाराष्ट्राला काय न्याय देणार.. राजकारणात वारसा हा विचारांचा असतो. जो मी घेऊन चालले आहे. गोपीनाथ मुंडेंचा वारसा ना धनंजय मुंडेंचा आहे ना पंकजा मुंडेंचा. यासाठी ना भाऊ ना बहिणी फक्त करुणा वहिनी... असं करुणा मुंडे म्हणाल्या.

पान ४ वरून

### परभणी जिल्ह्यातील

वलंगवाडी, केमापूर, पिंपरी खुर्द, पिंपरी बुद्रुक, माले टाकळी. तालुका जिंतूर - कुंभारी, दुधगांव क्र. १, कौसडी क्र. ७, धानोरा (बु) क्र. १, धानोरा (बु) क्र. २, वरुड (नृ) क्र. २, वरुड क्र. ३, कौसडी क्र. ५, चारठाणा क्र. ७, चारठाणा क्र. ४, नागनगाव, कडसावंगी, आडगाव (बा) क्र.१, जवळा (खु), कोक क्र.१कोक क्र. २, मुडा क्र.१, हनवतखेडा, आसेगाव क्र. ०२, करवली, माथला, सोन्ना, इटाली क्र.२, जोगवाडा क्र. ३, सोनापुर क्र.१, रिडज क्र. १, पिंपळगाव क्र.. १ (गा), दुधनगाव, चामणी, चिंचोली काळे, पोखर्णी तांडा, दहेगाव क्र.१,वडाळी, सावंगी (म्हा) क्र. १, हिवरखेडा, भोसी क्र. १, चौंधरणी, कसर, सोरजा क्र. १, मानधानी, वाघी धा, कोठा, बामणी बु., निवळी बु., गणपुर, हलविरा, मानकेश्वर (चा), डोहरा, गोंधळा, शेक, अकोली, माक, सावरगांव, सोस, येसेगाव, बलसा. तालुका पुर्णा - वझर क्र.१, कळगाव क्र. १, गौर क्र. ३, धनगर टाकळी क्र.१, आलेगाव क्र.१, हिवरा क्र.१, पिंपळा लोंखडे, रुज क्र.१, कानडखेडा क्र. १, कान्हेगाव क्र.१, ताडकळस क्र. ३, हटकरवाडी, कानडखेडा, फुकटगाव, एरंडेश्वर क्र. १, एरंडेश्वर क्र. ४,कातनेश्वर क्र. ४. तालुका मानवत - अटोळा, कोथाळा क्र.१, कोथाळा क्र.२, सावंगी मगर क्र.२, गोगलगाव क्र.२, देवलगाव क्र.१, रुढी क्र.२, केकरजवळा क्र.१, केकरजवळा क्र.२, खडकवाडी, रत्नापुर, रामेटाकळी क्र.१, रामपुरी क्र.१, हटकरवाडी क्र.१, लोहरा क्र.१, मंगरुळ पा. प क्र.४, इटाळा ब्र, खरबा, रामपुरी बु.,वांगी, थार, वझुर बु., हमदापुर, हटकरवाडा, रामेटाकळी, जाब, हसनापुर, शहापूर. तालुका गंगाखेड - धारखेड क्र.१, धारासुर क्र.३, सायाळा क्र.२, खंडाळी क्र.२, मरडसगाव क्र.१, बोर्ड क्र.२, कोद्री क्र.१, कोद्री क्र.२, माखणी क्र.३, बडवणी क्र.२, इसाद क्र.५, महातपुरी क्र.५, खळी, डोंगरगाव, अकोली, मानकादेवी, तांदुळवाडी, बडवणी, सांगळेवाडी, तालुका पाथरी - गोपेगाव क्र.१, कासापुरी, लिंबा क्र.४, देवनांद्रा क्र.४, रेनापुर क्र.१, तूरा क्र.१, टाकळगव्हाण, हादगाव क्र.२, रामपूरी क्र.३, मरडसगाव क्र.१, बाभळगाव क्र.४, विटा क्र.१, खर्डा क्र.१, बाभळगाव क्र.२ तालुका पालम - फरकंडा क्र.१, गुळखंड, आरखेड क्र.१, फळा क्र.१, पेठशिवणी क्र.३, सातेगाव क्र.१, शेख राजूर क्र.२, पेठपिंपळगांव क्र.३, वनभुजवाडी, आडगाव, नाव्हलगाव, चाटोरी क्र.४ बदरवाडी, खड़ी क्र.१, तांदुळवाडी क्र.१, पेंडू खु. क्र.१ आदी अंगणवाडी केंद्रांचा समावेश आहे.

मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी शिक्षण, आरोग्य आणि पोषण या तिन्ही घटकांचा समन्वय साधणारी स्मार्ट अंगणवाडी ही एक नवी क्रांती ठरणार आहे. स्मार्ट अंगणवाडी योजनेमुळे जिल्हयातील लहान मुलांना सुरक्षित, स्वच्छ आणि आनंददायी शिक्षणाचे वातावरण उपलब्ध होईल. यासोबतच महिलांच्या सक्षमीकरणासाठी ही योजना महत्वपूर्ण ठरणार आहे.

-मेघना साकोरे - बोर्डीकर, राज्यमंत्री,
महिला व बालविकास विभाग तथा पालकमंत्री परभणी

### मविआच्या ३१

असल्याचे त्यांनी सांगितले. येथील मतदारांनी मलबार हिल मतदारसंघात मतदान केले, असे त्यांनी सांगितले. जी नावे त्यांनी सांगितली ती आहेत, प्रभाकर तुकाराम पाटील, राम मधु भोईर, गजानन पुंडलिक भोईर हे आहेत. 'तृष्टीकरणाचा कळस त्यांनी गाठला. 'राज ठाकरे यांना हिंदू आणि दलित दुबार मतदार दिसतात. 'अडनाव म्हणून तुम्ही दुबार फटकवा म्हणतात. राज ठाकरे म्हणतात टेंम्पोभर पुरावे आणलेत. 'मग आमच्याकडे हे पुरावे आहेत हे हवेत विरले का? 'यालाच आम्ही व्होट जिहाद म्हणतो. 'राज ठाकरे, उद्धव ठाकरे भूमिका बदला भले नका येऊ आमच्या सोबत पण उघडा डोळे पाहा निट. राज ठाकरे आणि हिंदुत्व सोडलेले उद्धव ठाकरे यांनी आता या व्होट जिहादच्या कटाचा विचार करावा, असे म्हणत त्यांनी ठाकरे बंधूंवर हल्ला चढवला

### फलटणची डॉक्टर

उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्या कानावर हा विषय घातला आहे. न्यायाधीशांच्या नेतृत्वात ही एसआयटी स्थापन करावी आणि यात कुठलेही राजकारण होऊ नये. तपासाचे काम पारदर्शकपणे व्हावे, अशी आमची मागणी असल्याचे खासदार सुळे म्हणाले. या प्रकरणात आम्ही कुठलाही राजकीय दबाव येऊ देणार नाही. मुख्यमंत्र्यांनी चौकशी आधी कुणालाही निर्दोष ठरवू नये. तसेच मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात बोलणाऱ्यांना आवरलं पाहिजे, असेही त्या म्हणाल्या. महिला आयोगाच्या अध्यक्षाच्या वक्तव्यावर आम्ही नाराजी व्यक्त केली असून यांच्याबाबत काय निर्णय घ्यायचा तो त्यांच्या पक्षाचा आणि सरकारचा भाग असल्याचेही सुळे म्हणाल्या.

### रक्तदात्यांना मिळेना

ठिकठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. यामध्ये एकाच वेळी शेकडो रक्तदाते सहभागी होऊन रक्तदान करतात. या रक्तदानामुळे शेकडो माणसांना जीवदान मिळतो. कोणाचे आयुष्य वाचविणारे हे दान असल्याने या रक्तदानाला सर्वश्रेष्ठ दान म्हटले जाते. हे बोलूनच दान असल्याने याचा मोबदला मिळावा ही अपेक्षाच गैर आहे. पण तरीही रक्तदान करणाऱ्यास एक प्रमाणपत्र आणि एक कार्ड दिले जाते या एका कार्ड वर संकटाच्या वेळी त्यास एक रक्त पिशवी मिळते. यामागे अधिक लोकांनी रक्तदान करावे हा उद्देश आहे. परंतु या उद्देशाला जिल्हा रुग्णालयातील रक्त पेढी हरताळ फासताना दिसत आहे. बीड येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले सलीम आध्यक्ष युवा मंच दरवर्षी रक्तदान शिबीर घेत आहे. यावर्षी ही तीन महिन्यांपूर्वी शिबीर घेण्यात आले. या शिबिरामध्ये १३० रक्तदात्यानी रक्तदान करुन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यातील काही रक्तदात्याने रक्ताची गरज असल्याने त्यांना कार्ड देण्यात आले. पण त्यांना जिल्हा रुग्णालयातील रक्त मिळाले नाही. असा अनेकदा अनुभव आला. यामुळे रक्तदाते नाराज होत असल्याने रक्तदात्यांचा शिबिराला पुन्हा प्रतिसाद भेटेल का? असा संशय आहे. यामुळे जिल्हा रुग्णालय रक्त पेढी याचा विचार करावा, याकडे जिल्हा शल्यचिकित्सक यांनी लक्ष द्यावे अशी मागणी सलीम अध्यक्ष यांनी केली आहे.

पान १ वरून

### ती कोण लाडकी

७५ एवढी असून आयोगाने दिलेल्या खर्चानुसार, नगराध्यक्षपदासाठी १५ लाख खर्चाची मर्यादा असणार आहे, तर सदस्यांसाठी खर्च मर्यादा ही ७ लाख रुपये असणार आहे.५. राज्यातील दुबार मतदाराबाबत राज्य निवडणूक आयोगाने दखल घेतल्याचे दिनेश वाघमारे यांनी सांगितलं. दुबार मतदारांच्या नावासमोर डबल स्टार असेल. दुबार मतदाराने प्रतिसाद न दिल्यास नाव रद्द होईल. अधिकारी संपर्क साधून एक नाव रद्द करतील, तसेच इतर कोणत्या ठिकाणी मतदान केले नाही, असे डिक्लेरेशन मतदाराकडून घेतले जाईल. ६. मतदारांच्या सोयीसाठी नवीन अ‍ॅप देखील निवडणूक आयोगाने सुरू केलं आहे. त्यामुळे, मतदारांना डिजिटल पद्धतीने आपलं नाव मतदार यादीत शोधणे सहज शक्य होणार आहे. ७. राज्यातील निवडणुकांमध्ये मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी ३२ कॅम्पेन्स राबवल्या जाणार आहेत, दिव्यांग मतदार, तान्या बाळासहच्या स्त्रिया, ज्येष्ठांना मतदानात प्राधान्य देण्यात येईल. तर, काही मतदार केंद्र गुलाबी असतील, त्यात सर्व अधिकारी महिला असणार आहेत. ८. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून संबंधित नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या कार्यक्षेत्रात ही आचारसंहिता लागू असली तरी अन्य ठिकाणीदेखील नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या मतदारांवर प्रभाव पाडणारी घोषणा किंवा कृती करता येणार नाही. आचारसंहिता लागू झाल्यामुळे शासनाला नगरपरिषदा व नगरपंचींच्या कार्यक्षेत्राशी संबंधित धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत. नैसर्गिक आपत्तीबाबत करावयाच्या उपाययोजना किंवा मदतीसंदर्भात आचारसंहितेची आडकाठी असणार नाही. आचारसंहिता आणि कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने आजच (ता. ४ नोव्हेंबर २०२५) दोन स्वतंत्र आदेश निर्गमित केले आहेत.९. मतदान केंद्रावरील सुविधा - मतदान केंद्रावर दिव्यांग, तान्हाबाळासह असणाऱ्या स्त्रिया, गरोदर स्त्रिया, ज्येष्ठ नागरिक आदींना प्राधान्याने मतदान करून दिले जाईल. दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी मतदान केंद्रावर कायमस्वरुपी रॅम्पची व्यवस्था नसल्यास तात्पूर्ती सुविधा उभारली जाईल. व्हिलचेअरचीही व्यवस्था असेल. मतदान केंद्रावर विजेची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची, सावलीची सुविधा, शौचालयाची व्यवस्था उपलबद्ध करून दिली जाईल. संबंधित ठिकाणी कृष्ठरोग्यांसाठी वेगळे वसतिगृह / आश्रम असल्यास त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदान केंद्र उभारण्यास हरकत नसेल. तिथे उपलब्धतेनुसार डॉक्टरांची नेमणूक केली जाईल. सर्व मतदान केंद्रांमध्ये किमान सुविधा असणे आवश्यकचे असेल; परंतु शक्य असेल तिथे आदर्श मतदान केंद्र उभारण्याचा प्रयत्न असेल. महिला मतदारांची संख्या जास्त असलेल्या ठिकाणी सर्व निवडणूक अधिकारी-कर्मचारी आणि पोलिस कर्मचारी महिला असतील, असे मतदान केंद्र 'पिंक मतदान केंद्र' म्हणून ओळखले जाईल. मतदान केंद्राच्या आत मतदारांना मोबाईल दूरध्वनी नेण्यास बंदी असेल. मतदान केंद्राच्या इमारतीमध्ये; परंतु मतदान केंद्राच्या बाहेर मतदारांना मोबाईल दूरध्वनी जमा करण्यासाठी शक्य तिथे कक्ष असेल.

१०. मनुष्यबळाची व्यवस्था - नगरपरिषद व नगरपंचायतींच्या या निवडणुकांसाठी २८८ निवडणूक निर्णय अधिकारी आणि २८८ सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची आवश्यकता असून, त्याची पूर्तता करण्यात आली आहे. साधारणतः सुमारे ६६,७७५ इतक्या निवडणूक अधिकारी कर्मचाऱ्यांची गरज भासेल, तीदेखील व्यवस्था झाली आहे. महसूल विभागीय आयुक्त आणि सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक मनुष्यबळाबाबत निर्देश देण्यात आले आहेत. राज्याच्या मुख्य सचिवांसोबतदेखील बैठकी आयोजित करून मनुष्यबळाबाबत नियोजन केले आहे.

### दुबार मतदार कसं

असल्याने अन्यत्र मतदान करता येणार नाही. तसेच मतदानाच्या दोन दिवस आधी दुबार मतदारांची निश्चित संख्या स्पष्ट होईल अशी माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.ज्या मतदाराच्या नावापुढे डबल स्टार असेल तो कोणत्या केंद्रावर मतदान करणार आहे याची माहिती द्यावी लागणार आहे. त्यानुसार त्याने मतदान केल्यानंतर तशी माहिती दुसऱ्या केंद्रावर देण्यात येणार असल्याचं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यानुसार २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून ३ डिसेंबर रोजी निकाल लागणार आहे.

### मतदान केंद्रांत मोबाईल

यावेळी काही मतदान केंद्रांना विशेष गुलाबी मतदान केंद्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. या गुलाबी केंद्रांवर सर्व अधिकारी, कर्मचारी आणि पोलिस महिला असतील.

निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी २८८ निवडणूक अधिकारी आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी नेमण्यात आले आहेत. तसेच ६६,७७५ पोलिंग आणि काऊंटिंग स्टाफची नियुक्ती करण्यात आली आहे. हे सर्व कर्मचारी मतदान प्रक्रिया पारदर्शक योग्य पद्धतीने पार पडण्यात मदत करतील.मतदानाचा दिवस हा लोकशाहीचा सण मानला जातो. त्यामुळे सर्व मतदारांनी निर्धास्तपणे मतदान केंद्रावर जाऊन आपले मताधिकार बजावावेत, असे आवाहन निवडणूक आयोगाकडून करण्यात आले आहे.

### अजित पवारांच्या

पटेल, शेख निजाम भाई, बप्पासाहेब घुगे, सुधीर काकडे, अजिंक्य आनेराव, संभाजी काळे, संतोष क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. स्थानिकच्या निवडणूका तोंडावर आहेत. त्याअनुषंगानेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ताकतीने कामाला लागलेला आहे. कोणत्याही परिस्थितीत या निवडणूकीत दिग्विजय मिळवायचाच, असा निर्धार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी केलेला आहे. यावर काल मुंबईत झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. बीड जिल्ह्यातील निवडणूकीसंदर्भात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी अजित दादांसमोर आपआपले मत व्यक्त केले. यावेळी. गटबाजीच्या संदर्भात अनेकांनी प्रश्न उपस्थित केले. गजबाजी संपवून आपण या निवडणूकीत विजय मिळवू असा निर्धारही यावेळी करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर या निवडणूका स्वबळावर लढवाव्यात असा नाराच या बैठकीतून कार्यकर्त्यांनी दिला आहे. त्यामुळे आता या नाऱ्यावर अजित पवार नेमकी कोणती भुमिका घेतात याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून असणार आहे.

दौंड, मोदी, लोमटेंचे त्रिकुट अंबाजोगाईत सत्ता आणणारच

स्थानिकच्या निवडणूका पुर्णपणे स्वबळावर लढवाव्यात, अशी स्पष्ट भूमिका या बैठकीत पाया मोदी यांनी बोलून दाखविली. माजी आ. संजय दौंड, पापा मोदी आणि लोमटे हे त्रिकूट अंबाजोगाईत राष्ट्रवादीची एक हाती सत्ता आणतील ? असा विश्वास यावेळी त्यांच्या बोलण्यातून यावेळी सर्वांना आल्याचेही पहायला मिळाले.

तीन गटांवरून आ. सोळंके, आ. पंडित आमने सामने

या बैठकीत आ. विजयसिंह पंडित यांनी माजलगावमधील तालखेड आणि बीडमधील दोन अशा तीन गटांवर आपला प्रभाव असल्याचे म्हटले, येथील कार्यकत्यांची हेच शोलून दाखवित त्यांनी यावेळी हरतक्षेप नोंदविला. यावर आ प्रकाश सोळंकेंनी प्रतिउत्तरही दिले, ज्याने त्याने आपल्या मतदार संथात लक्ष द्यावे, गटबाजी कुठेही नसू नये, असे सांगत आ. सोळंके बीडमध्ये योगेश क्षीरसागरांच्या बाजूने उभे राहिल्याचे यावेळी पहायला मिळाले.

### दोन माजी उपनगराध्यक्ष

तुतारीचा आवाज गुंजणार याकडे आता बीडकरांचे लक्ष लागून आहे.हा प्रभागा हा उच्च शिक्षित मतदार असल्याने ते पुर्ण विचारपुर्वकच मतदान करणार आहेत. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून फारूक पटेल हे उमेदवार असणार आहेत तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून हाजी नसीम इनामदार हे उमेदवार असण्याची शक्यता आहे अशी चर्चा प्रभागात होत आहे. आता निवडणूकीची उमेदवारी अर्ज भरल्यानंतरच हे स्पष्ट होणार की कोणाचा सामना कोणासोबत होणार आहे.